# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०३/२०२५ (सोमवार )**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ३१ जनावरांची सुटका, २४ लाख ६५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाख नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०३/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,जबलपुर रोड कडुन नागपुर कडे १२ चाकी ट्रक क्रमांक एम एच ३४ ए.बी. ६६२९ मधुन काही इसम कत्तलीकरीता अवैधरित्या जनावरांची वाहतुक करत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत नागपुर जबलपुर बायपास रोडवरील कुंभलकर धाब्या समोरील रोडवर नाकाबंदी केली असता संशयीत १२ चाकी ट्रक क्रमांक एम एच ३४ ए. बी. ६६२९ **येताना दिसला.** सदर **वाहन** थांबवुन **वाहनाची** पाहणी केली असता त्यामध्ये ३९ काळे,पांढरे,लाल रंगाचे लहान मोठे गोवंश जनावरे दिसुन आले.त्यापैकी ८ जनावरे मयत झालेली दिसली. जनावरांना निर्दयते कोंबुन आखुड दोरीमध्ये बांधुन, त्यांची सुरक्षेची काळजी न घेता तसेच चारापाणीची व्यवस्था वाहतुक करतांना त्यांची वाहतुक केली जात असल्याचे दिसले. वाहन चालकाला त्याचे नाव विचारले असता चालक **ईस्तेखार खान गुलाब खान, वय ३२ वर्षे रा. रिवा ता. जि. रिवा ,मध्यप्रदेश आणि त्याचा साथीदार आरोपी नामे शेख जावेद शेख जफर, वय २८ वर्षे, रा. ताजबाग सिंधीवन,उमरेड रोड,नागपुर जि. नागपुर हे** मिळुन आले. पोलीसांनी आरोपीतांना विचारपुर केली असता सदर गोवंश निजामाबाद येथे घेवुन जात असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक १२ चाकी ट्रक क्रमांक एम एच ३४ ए.बी. ६६२९ किंमती २०,००,०००/— रूपये. आणि ३१ गोवंश जनावरे ४,६५,००० /— रूपये एकुण किंमती २४,६५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. **३१ गोवंश जनावरांना गो विज्ञान अनुसंधान केंद्र ,देवलापार येथे सुरक्षीतरित्या दाखल आले आहे.**

चालक **ईस्तेखार खान गुलाब खान, वय ३२ वर्षे रा. रिवा ता. जि. रिवा ,मध्यप्रदेश आणि त्याचा साथीदार आरोपी नामे शेख जावेद शेख जफर, वय २८ वर्षे रा. ताजबाग सिंधीवन,उमरेड रोड,नागपुर जि. नागपुर** यांच्या विरूध्द कलम ११(१) (क) (ड) (च) (ज) (ट) (झ) प्रा.छ. अधि. सह कलम ५ (१) अ ,५(२) ब ,९ महा. प्राणी सुरक्षा अधिनियम सह कलम ३२५ ३(५) भा. न्या.सं अन्वये पोलीस स्टेशन कन्हान येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# प्राण्यांना निर्दयतेने वागणूक देणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोस्टे केळवद** :— दिनांक २८/०२/२०२५ रोजी रात्री केळवद पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की,काही इसम बिहाडा फाटा येथुन अंधारात संशयीतरित्या बैलांना कोठेतरी घेवुन जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस बिहाडा फाटा कडे जात असतांना रामपुरी फाटा,जवळ दोन इसम त्याचा हातात तुतारीने बैलांना मागुन टोचुन हाकलत बिहाडा फाटाकडे घेवुन जातांना आढळुन आले पोलीसांना पाहुन सदर दोन्ही इसम हे पळुन जात असताना पोलीसांनी त्यापैकी एकास पकडुन त्याचे नाव गाव विचारले असता त्यांने आपले नाव रवि सुभाष खरात वय—२९ वर्ष रा.दुधाळा तह.सौंसर जि.पांढुर्णा (म.प्र) असे सांगितले व एक इसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. पळून गेलेल्या इसमाचे नाव प्रेमराज मारोती राऊत रा. दुधाळा तह.सौंसर जि. पांढुर्णा (म.प्र) असे सांगितले. सदर बैल हे कोणाचे सांगण्यावरुण कोठुन आणले व कोठे घेवुन जात आहे असे विचारले असता तेव्हा मिळुन आलेल्या आरोपीने सांगितले की,आरीफ शेख रा.सावरगाव याचे सांगण्यावरुण आम्ही सदर बैल हे सवरनी ग्रामपंचायत येथुन घेतले असुन केळवद मार्गे आरीफ शेख कडे सावरगाव ता.नरखेड येथे घेवुन जात आहे असे अशी माहीती दिली. आरोपीतांनी सदर बैलांना आखुड दोरीमध्ये बांधुन क्रुरतेने वागणुक देवुन लाकडी तुतारीने मागुन टोचुन मारत हाकलत त्यांची सुरक्षेची काळजी न घेता तसेच चारापाणीची व्यवस्था न करता सावरगाव ता.नरखेड येथे घेवुन जातांना मिळुन आले. सदर बैलांबाबतचे खरेदी—विक्री बाबतचे कागदपत्राची मागणी केली असता त्यांनी खरेदी—विक्री बाबतचे कोणतेही कागदपत्रे सादर केले नाही. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन एकुन १६ लाल, पांढरे तसेच भुरकट रंगाचे बैल किंमत अंदाजे प्रत्येकी १०,०००—/रु प्रमाणे एकुण १,६००००/—रु चा गोवंश पंचासमक्ष जप्त केला आहे.

नमुद आरोपी यांचेविरुद्ध कलम ११(१) (अ),(ड),(फ) प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास करण्याबाबत अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास केळवद पोलीस करीत आहेत.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक **०१/०३/२०२५ रोजी रात्री मौदा पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की,** करन हॉटेलच्या मागे मौदा येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी क्र. १)मनोहर वासुदेव ठोसरे वय ४२ वर्षे रा. वार्ड नं ९ मौदा जि नागपूर,२) स्वपनील रुपराम कुभंलकर वय ३० वर्षे रा. वार्ड नं ९ मौदा जि नागपूर,३) ज्ञानेश्वर चुडामण नाकाडे वय ४७ वर्षे रा. वार्ड नं ५ मौदा जि. नागपूर, ४) रामा किसन नाकाडे वय ४७वर्षे रा. वार्ड नं ५ मौदा जि नागपूर,५) दिनेश विनायक पितळे वय ३५ वर्षे रा. वार्ड नं १ मौदा जि नागपूर,६) उमेश महादेव महाले वय ३८ वर्षे रा. वार्ड नं १७ मौदा जि नागपूर, ७) ओमकार जर्नाधन मेहर वय ४० वर्षे रा. नवेगांव, ८) निलेश धर्मराज शेन्डे वय ३२ वर्षे रा. भामेवाडा वार्ड नं २ हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ०४ मोबाईल किंमती ७०,०००/—रूपयांचा ,५२ तास पत्ते किंमत ५० /—रूपये, रोख रक्कम ८२००/—**रूपये एकुण किंमती ७८२००/—रूपयांचा मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर